**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ३७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१२८** **दिनांक : ०४ /०३/२०२५**
**विभाग** : नगररचना विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** मौजे नागापूर जुना स.नं.१३०/१ नविन स.नं२८/१ ची जागा संभाजीनगर खंडपीठ यांचे आदेशा प्रमाणे संपादित करणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, उपरोक्त विषया बाबत सादर करणेत येते की, मौजे नागापूर येथील जुना स.नं.१३०/१ नविन सं.नं.२८/१ ची जागा औरंगाबाद खंडपिठ यांचे आदेशा प्रमाणे संपादित करणे बाबत संदर्भीय अर्जदार वर्षा बाळासाहेब सोनवणे यांनी इकडेस अर्ज दिलेला आहे.

याबाबत सादर करणेत येते की, मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे रिटपिटीशन क्रमांक ६९३६/२०१४ मधील सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक ६८२८/२०२४ मध्ये दिनांक ९/८/२०२४ रोजी निर्णय पारित झालेला आहे.

मौजे नागापूर येथील जुना स.नं.१३०/१ नविन सं.नं.२८/१ ची जागा श्रीमती. वर्षा बाळासाहेब सोनवणे व इतर यांचे मालकीची असून सदर सर्व्हे मध्ये स्मशानभुमी/दफनभुमी असलेमुळे अहिल्यानगर महानगरपालिकेने भूसंपादन करुन त्याची नुकसान भरपाई मिळणे बाबत दावा दाखल करणेत आलेला होता. सदर दाव्यातील निर्णया नुसार मौजे नागापूर येथील उपरोक्त सर्व्हे नंबरची मोजणी उपअधिक्षक भुमी अभिलेख यांनी मोजणी करुन सदर मोजणीची प्रत वादी यांनी महानगरपालिकेस पुरविल्यानंतर महानगरपालिकेने सदर सर्व्हे नंबर पैकी किती जागा स्मशान भुमीसाठी/दफनभुमी साठी आवश्यक आहे हे निश्चीत करुन त्याबाबत भु-संपादनाची कार्यवाही मोजणी नकाशा मिळाले नंतर साठ दिवसात करणे यावी असे निर्णयात नमूद केलेले आहे. तसेच सदर संपादनाची कार्यवाही विहीत केलेल्या मुदतीत भु-संपादन अधिनियम २०१३ प्रमाणे करणे बाबत नमूद केलेले आहे.

वरील विषयाच्या अनुषंगाने अर्जदार यांनी संदर्भीय अर्जा सोबत शासकीय मोजणीचा नकाशा इकडेस सादर केलेला आहे. नागापूर येथील स.नं. २८/१ चे एकूण क्षेत्र चालू ७/१२ उता-या प्रमाणे २ हेक्टर ७० आर असून मोजणी नकाशा मध्ये स्मशानभुमी/दफनभुमी दर्शविणेत आलेले नाही. नागापूर येथील विकास योजनेचा नकाशा पहाता त्यामध्ये स.नं.२८/१ यामध्ये विद्यमान स्मशानभुमी/दफनभुमी दर्शविणेत आलेली आहे.तसेच पुर्वेस नगर-मनमाड हाय-वे असून त्याच्या उत्तर-दक्षिण बाजूस काही भाग आहे. तसेच पुर्वेस सिना-नदी असल्याने काही भाग हा ग्रिन बेल्ट मध्ये दर्शविणेत आलेला आहे.

गट क्र.२८/१ या जागचे सर्व्हेक्षण केले असता ही जागा चिंचोळया पट्टिच्या स्वरुपात असून त्याजागेतून उत्तर-दक्षीण ९.०० मीटर रुंदिचा रस्ता विकास आराखडयात दर्शविणेत आलेला आहे. या रस्त्याचाच पोहोच रस्ता म्हणून वापर करुन हिंदु स्मशानभुमी म्हणून विकसीत झाली आहे. या स्मशानभुमीच्या दक्षीणेस मुस्लीम समाजाची व महानुभव समाजाची दफनभुमी असून त्याच्या दक्षीणेस ख्रिश्चन समाजाची दफनभुमी आहे. हिंदू स्मशान भुमीच्या उत्तरेस सर्व्हे नं.२८/२ एकूण क्षेत्र ०.११ आर असून त्याठिकाणी मातंग समाजाची स्मशानभुमी आहे. या स.नं.च्या पुर्वेस सिना नदी असून या नदीमुळे काही भाग वाहून गेलेला आहे व उर्वरित जागा पडीक आहे.

अहिल्यानगर शहराच्या वाढीव हद्दीचा प्रारुप विकास आराखडयामध्ये सदर जमीनीपैकी काही जमीन ग्रीन बेल्ट म्हणून दर्शविणेत आलेली आहे तर काही भाग विद्यमान स्मशानभुमी /दफनभुमी म्हणून दर्शविणेत आलेला आहे. याबाबतीत प्रस्ताव क्रमांक ७ दि.१५/९/२००८ अन्वये मा.महासभे मध्ये ठराव पारित झालेला आहे. त्यामध्ये सदर सर्व्हे नंबरच्या सर्व तांत्रीक बाजू तपासून सदरच्या स्मशानभुमी/दफनभुमी साठी आवश्यक असणारी जागा ही खाजगी मालकीची असल्यास सदर जागा संपादन करणे बाबत ठराव झालेला आहे.

सदर सर्व्हे नंबर हा चिंचोळा असून त्याची लांबी जास्त असलेने मोजणी नकाशाची प्रत १:१००० ऐवजी १:२००० मध्ये दर्शविणेत आलेला असून त्यामध्ये विद्यमान स्मशानभुमीचे क्षेत्र दर्शविणेत आलेले नाही.सदर सर्व्हे नंबर मध्ये अंदाजित ०.२०आर क्षेत्रा मध्ये हिंदु दहनभुमी असून मुस्लीम कब्रस्तान व ख्रिश्चन दफनभुमी या पुर्वी पासून अस्तीत्वात आहेत. सदर सर्व्हे नंबरचा दक्षीणे कडील रस्त्याच्या पलिकडील भाग हा नदीपात्रात वाहून गेलेला आहे.त्यामुळे सदर जागेची संपादना करीता आवश्यकता नाही. उत्तरे कडील काही भाग हा गावठाणा लगत असून ती सध्या खुली आहे.

स.नं.२८/१ चे एकूण २ हे.७० आर क्षेत्रापैकी अंदाजित ०.२० आर एवढे क्षेत्र हिंदु स्मशानभुमी साठी संपादित करावे लागणार आहे.तरी सदर क्षेत्राचे संपादित होणा-या क्षेत्रास भुसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे संपादित क्षेत्र व सदर क्षेत्राचा आजचा रेडीरेकनरचा दर हा खालील प्रमाणे आहे.

| **स.नं.** | **अंदाजित संपादित क्षेत्र** | **रेडीरेकनचा दर हेक्टरी** | **संपादित क्षेत्राची किंमत** |
|---|---|---|---|
| (जुना १३०/१) २८/१ | ०.२० आर | २६,१०,०००/- | ५,२२,०००/- |

सदर संपादित क्षेत्राची जमीनीची किंमत येत असून भुसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे येणा-या जमीनीच्या किमतीच्या १०० टक्के दिलासा रक्कम ५,२२,०००/- असे एकूण १०,४४,०००/- असू त्यावर वाढीव मोबदला २५टक्के २,६१,०००/- असे एकूण रु. १३,०५,०००/- एवढी रक्कम संबंधीतांना अंदाजित अदा करावी लागणार आहे.

वर नमूद केलेली रक्कम ही सन २०२२-२३ च्या रेडीरेकनर प्रमाणे निश्चीत केलेली आहे. सदर रक्कम अदा करते वेळी जर रेडीरेकनरच्या दरात बदल झाल्यास त्या प्रमाणे रक्कम संबंधीतांना अदा करावी लागेल. तसेच सदर टिपणीस मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर जागेबाबत अवश्यक त्या तांत्रिक बाबी तपासून तसा प्रस्ताव फेरसादर करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |